



RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड

# जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784






वर्ष ३ रे | अंक : १४५ वा मंगळवार दि. १५ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये


# शिवसेना कुणाची? आता अंतिम फैसला, सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद...

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

शिवसेनेतील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाला धनुष्यबाण हे निवडणूक चिन्ह देण्याच्या विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या निर्णयाविरुद्ध उबाठा गटाने दाखल केलेल्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात आता २० ऑगस्ट रोजी अंतिम सुनावणी सुरू करण्यात येणार आहे. मात्र या प्रकरणाचा निकाल आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांआधी येणार की नंतर येणार याबाबतची संदिग्धता कायम आहे. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने सोमवारी सुनावणीत स्पष्ट केले की, हा मुद्दा बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे आणि अनिश्चितता चालू ठेवता येणार नाही. त्यानंतर २० ऑगस्ट रोजी याची अंतिम सुनावणी करण्यात येईल, अशी तारीख आज सायंकाळी सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर जाहीर झाली. मात्र त्यातही बदल होऊ शकतात असे कायदेतज्ज्ञांनी सांगितले. विधानसभाध्यक्ष नार्वेकर यांनी १० जानेवारी २०२४ रोजी एकनाथ शिंदे यांच्यासह सत्ताधारी गटातील १६ आमदारांना अपात्र ठरवण्याची उबाठा गटाची याचिका फेटाळली होती. त्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देताना उबाठा गटाने आरोप केला होता की, विधानसभा अध्यक्षांचा आदेश स्पष्टपणे बेकायदेशीर आणि विकृत आहे आणि पक्षांतर करणाऱ्यांना शिक्षा करण्याऐवजी तोच गट खरा राजकीय पक्ष असल्याचे सांगून त्यांनी आरोपींनाच बक्षीस दिले आजच्या सुनावणीत उबाठा गटाकडून बाजू मांडणारे वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेता या प्रकरणाचा लवकर निकाल अपेक्षित असल्याचे सांगितले. २०२३ मध्ये शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला विधानसभेतील बहुमताच्या आधारे निवडणूक चिन्ह वाटप करण्याचा विधानसभा अध्यक्षांचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निकालाच्या विरुद्ध असल्याचे सिब्बल म्हणाले. शिंदे गटाकडून



बाजू मांडणारे वरिष्ठ वकील नीरज किशन कौल म्हणाले की, न्यायालयाने या मुद्द्यावर तातडीची सुनावणी घेण्यास आधीच नकार दिला आहे. ज्येष्ठ वकील सिध्दार्थ शिंदे यांच्या मते, २० ऑगस्ट रोजी जेव्हा हा खटला अंतिम सुनावणीसाठी येईल तेव्हा न्यायालयीन नियमांच्या आधारे एकूण ३ वकील युक्तिवाद करू शकतील. उबाठा गटाच्या वतीने फक्त १ वकील (बहुधा कपिल सिब्बल) तोंडी युक्तिवाद करू शकतील. कारण ठाकरे एकमेव याचिकाकर्ता आहेत. शिंदे गटाच्या वतीने फक्त १ वकील युक्तिवाद करू शकतील जे बहुधा मुकुल रोहतगी असतील. भारतीय निवडणूक आयोग देखील प्रतिवादी असल्याने निवडणूक आयोगाचे प्रतिनिधित्व करणारे १ वकील युक्तिवाद करतील.

## सहकार विद्या मंदिर, बुलढाणा चे महाराष्ट्र राज्य प्रज्ञा शोध परीक्षेत राज्यस्तरावर सुयश...

**जनसंचलन/ बुलढाणा**

बुलढाणा येथील सहकार विद्या मंदिर या सी.बी.एस.सी. मान्यता प्राप्त शाळेचा वर्ग १० वी चा विद्यार्थी चि.पार्थ तायडे यानी सन २०२४-२५ मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य प्रज्ञा शोध परीक्षेत बुलढाणा जिल्हातून प्रथम क्रमांक प्राप्त आहे. तसेच या परीक्षेत चि. हर्षल भोकन, अर्नव पंडित, आदित्य ठेंग व वंश राजपूत यांनी उत्तम गुण प्राप्त करुन प्रोत्साहनपर बक्षीस मिळविले. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल सुकेश झंवर, प्राचार्य, मुख्यध्यापीका तसेच शिक्षक वृंद यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्यात. सर्व यशस्वी विद्याथ्र्यांनी त्यांच्या




यशाचे श्रेय अध्यक्षा सौ.कोमल झंवर, प्राचार्य, मुख्यध्यापीका व सर्व शिक्षक वृंद यांना दिले.

## अनैतिक संबंधातून महिलेचा खून!

### दीरानेच दोरीने गळा आवळून धरणात फेकले!

**जनसंचलन/ अमडापूर**

नायगाव खुर्द शिवारातील टाकळी धरणाच्या पाण्यात आढळून आलेल्या महिलेचा खून झाल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. हा खून अनैतिक संबंधातून दीराने केल्याचे समोर आले आहे. मधुकर शामराव गायकवाड असे आरोपीचे नाव असून त्याने तिचा दोरीने गळा आवळून धरणात फेकून दिल्याचे उघड झाले आहे. अमडापुर पोलीस स्टेशन अंतर्गत ग्राम नायगाव खुर्द येथील किशोर शामराव गायकवाड यांची पत्नी आशा गायकवाड २९ जून रोजी शेतातून घरी जाण्यास निघाली असताना ती घरी पोहोचली नाही. याबाबत पतीने पोलीस ठाण्यात मिसींग दाखल केली. दरम्यान या महिलेचा मृतदेह नायगाव खुर्दशिवारातील पेनटाकळी धरणात आढळून आला.मृतक महीलेच्या भावाने पती,सासरा, सासू व दीर हे महिलेला माहेर वरून तीस हजार रुपये आणण्यासाठी त्रास देत असल्याची तक्रार दिल्याने सासरच्या मंडळी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस तपास सुरू असताना गुन्ह्यातील आरोपी मृत महिलेचा दीर मधुकर शामराव गायकवाड याने कबूली दिली की, मृत महिलेशी ३ वर्षा पासून प्रेम संबंध होते. सदर महिला वारंवार लग्न करण्याची मागणी करत होती.दरम्यान महिलेला कुंकू लावून लग्नाचा बनाव केला होता.महिलेच्या सततच्या पैशाची मागणी वाढत



चालली असल्याने आरोपी मधुकर त्रासून गेला होता.दरम्यान महिलेचा काटा काढण्याचे त्याने ठरविले.२९ जून रोजी सदर महिला शेतातून घरी जात असताना आरोपी मधुकर तिला गाठून पेनटाकळी धरणाजवळ आला.धरणाच्या पाण्याच्या जवळील एका दगडावर आरोपी मधूकर याने महिलेचा दोरीने गळा वळून तिला धरणाच्या पाण्यात फेकून दिले.या खुना प्रकरणी आरोपीवर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चीन,पाक,बांगलादेश आघाडीचा अर्थ...

## संपादकीय लेख

अस्तित्वहिन झालेल्या सार्क या दक्षिण आशियायी देशांच्या संघटनेला पर्याय म्हणून चीनने पाकिस्तान व बांगलादेश या देशांना बरोबर घेऊन एक पर्यायी आशियायी संघटना स्थापण्याचा विचार चालविला आहे. यासंबंधी विचार करण्यासाठी या तीन देशांची १९ जूनला चीनमध्ये कुनमिंग येथे एक बैठक झाली. सुरुवातीला हे दोन देश बरोबर घ्यायचे आणि दक्षिण आशियातील अफगाणिस्तान, म्यानमार, श्रीलंका, मालदीव आदी देशांना त्यात सामील करून घ्यायचे, असा चीनचा विचार असल्याचे सकृतदर्शनी दिसते. या संघटनेत भारताला घ्यायचे की नाही हे स्पष्ट नाही. पण ही संघटना म्हणजे एक भारतविरोधी आघाडी असणार, हे मात्र स्पष्ट आहे. भारताच्या सुरक्षेला सध्या पश्चिम आणि उत्तरेकडून धोका आहेच, या संघटनेच्या निमित्ताने पूर्वेकडूनही ही धोका निर्माण करण्याचा चीनचा स्पष्ट इरादा दिसत आहे. त्यामुळे चीनचा हा विचार पुरेशा गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. बऱ्याच राजकीय निरीक्षकांचे असे मत आहे की, चीनच्या भूराजनीतिक धोरणात अमेरिका आणि तैवानला जेवढे महत्त्व आहे, तेवढे भारताला नाही. ते खरेच आहे, पण ही दोन्ही ध्येये गाठण्यात भारताचा मोठा अडथळा आहे, असे चिनी धोरणतज्ज्ञांना वाटते. त्यामुळे अमेरिका व तैवानआधी भारताला आवर घालून त्याला त्याच्या सीमांमध्ये कोंडणे चीनला आवश्यक वाटते. त्यासाठी भारताला सर्व बाजूंनी घेरण्याचे चीनचे धोरण आहे. त्याचाच एक भाग म्हणून ही तीन देशांच्या आघाडीची कल्पना पुढे आली आहे. या आघाडीतला बांगलादेश हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. पाकिस्तान व चीनची आघाडी आधीपासूनच आहे, पण बांगलादेशचे सध्याचे प्रमुख महंमद युनूस यांनी चीनमध्ये भारतविरोधी वक्तव्ये केल्यापासून चीनच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. महंमद युनूस हेच यापुढच्या काळात बांगलादेशचे सत्ताधारी राहिले तर चीनच्या नेतृत्वाखालची ही आघाडी लगेच स्थापनही होईल, पण बांगलादेशात येत्या काळात निवडणुका झाल्या तर काय स्थिती राहील, यावर या आघाडीचे भवितव्य अवलंबूत असेल. येती निवडणूक लढविण्यास शेख हसीना यांच्या अवामी लीगला बंदी घातली तरी या पक्षाचे कार्यकर्ते अन्य पक्ष स्थापून निवडणूक लढवतील, पण ते सत्तेवर येण्याची शक्यता कमी आहे. याचा अर्थ बांगलादेशातील भारतवादी राजकीय पक्ष हा दुबळा असेल. खालिदा झिया यांची बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टी सत्तेवर आली तर चीनशी ही आघाडी अधिकृतपणे होण्याची शक्यता कमी असेल. कारण हा पक्ष भारतविरोधी समजला जात असला तरी तो चीनच्या फार जवळ जाणारा असणार नाही. या पक्षाच्या नव्या नेतृत्वाला भारताशी चांगले संबंध ठेवण्याचे महत्त्व पटलेले दिसते. सध्या तरी हे नेतृत्व भारताच्या संपर्कात आहे. बाकी त्या देशात काही इस्लामी पक्ष आहेत पण त्यांची शक्ती मर्यादित आहे. त्यामुळे बांगलादेश चीनप्रणित आघाडीत सामील होण्याची शक्यता ५०-५० टक्के गृहीत धरावी लागेल. येथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, बांगलादेशची जनता त्यांचा १९७१ चा स्वातंत्र्यलढा व त्यातील पाकिस्तानची नृशंस भूमिका जवळपास विसरलेली आहे. बांगलादेशातील एका वृत्तपत्राने अलीकडेच ङ्गबांगलादेशला कोणता देश जवळचा आहे भारत की पाकिस्तानफ अशी पाहणी केली तेव्हा बहुसंख्य बांगलादेशींचे मत ङ्गपाकिस्तान हा मुसलमान देश असल्यामुळे तो जवळचा वाटतो,फ असे होते. त्यामुळे बांगलादेशातील जनमत भारताच्या बाजूने असेल असे मानणे अवघड आहे. त्यामुळे चीनच्या नेतृत्वाखालील आघाडीसाठी बांगलादेशची जमीन सुपीक आहे. ही आघाडी झालीच तर भारतापुढे कोणत्या समस्या उभ्या राहणार आहेत व त्यांना कसं तोंड द्यायचे याचा विचार करावा लागेल.



ही आघाडी झाल्यानंतर चीन प्रथम बांगलादेश व म्यानमार या दोन देशांत आपल्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यास सुरुवात करील. हे दोन्ही देश चीनच्या बेल्ट अँड रोड (बीआरआय) प्रकल्पात आधीपासूनच सामील आहेत. त्यामुळे या प्रकल्पाअंतर्गत असलेली कामे तेथे सुरू आहेतच. आता चीन या दोन्ही देशांत दुहेरी वापराची ( म्हणजे लष्करी व नागरी वापराची) बंदरे व विमानतळ बांधण्याची कामे हाती घेऊ शकतो. बांगलादेशच्या भूमीचा वापर भारतावर नजर ठेवण्यासाठी, टेहळणी करण्यासाठी तसेच सीमेवरील राज्यांत बंडखोरीला चालना देण्यासाठी करू शकतो. या आघाडीमुळे भारताने स्थापन केलेल्या ब्रीमस्टेक ही संघटना निष्प्रभ होऊ शकते. कारण बांगलादेश व म्यानमार हे या संघटनेचे मुख्य घटक आहेत. भारत या देशांमधून आग्नेय आशियायी देशांशी आर्थिक संबंध वाढवू इच्छितो. त्यासाठी या दोन्ही देशांनी सहकार्य नाकारले तर भारताचे लूक ईस्ट किवा नेबर फर्स्ट हे धोरणच फसू शकते.

# डी एस लहाने यांच्या नेतृत्वात १०० कार्यकर्त्यांचा शिवसेना उ.बा.ठा पक्षात प्रवेश...

**जनसंचलन/बुलढाणा**

राजकारणाच्या पलीकडे जाऊन समाजकारणाला प्राधान्य देणारे शिवसेना जिल्हा समन्वयक प्रा. डी एस लहाने यांचा नेतृत्वात आज शेकडो शिवसैनिकांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षांमध्ये प्रवेश केला.मुंबई येथे मातोश्रीवर पक्षप्रवेश सोहळा जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत , राज्य प्रवक्त्या जयश्रीताई शेळके, आ. सिद्धार्थ खरात यांच्या मार्गदर्शनात पार पडला. यावेळी पक्षप्रमुखांनी हातावर शिवबंधन बांधून पक्ष कार्यासाठी ताकदीने पुढे येण्याचे आवाहन केले. बुलढाणा विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रा. डी एस लहाने यांनी विविध सामाजिक उपक्रम राबवून आपला परिचय दिला आहे. सध्या ते शिवसेनेचे जिल्हा समन्वयक असून त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत इतर पक्षातील पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेमध्ये प्रवेश घेतला. दोन दिवसापासून हे शिवसैनिक मुंबईकडे रवाना झाले होते. मातोश्री येथे दुपारची वेळ देण्यात आली होती. या वेळेत पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी



सर्वांशी संवाद साधला. त्यांनी डी एस लहाने सरांच्या कार्याचे कौतुकही केले. यावेळी शिवसेना नेते विनायक राऊत, जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत, प्रदेश प्रवक्त्या जयश्रीताई शेळके, आ.सिद्धार्थ खरात आदी उपस्थितीत होते. डी एस लहाने यांच्या नेतृत्वात उद्धव ठाकरे यांच्या हस्ते अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार उर्फ बबलू शेठ माजी उपसभापती पंचायत समिती बुलढाणा ,समाधान जाधव, धोंडोबा गायकवाड, प्रमोद कळस्कर, श्रीकृष्ण मापारी, मनोज वानखेडे, त्यांच्यासह चार पंचायत समिती सदस्य, आजी माजी सरपंच,उपसरपंच ,आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य, बाजार समितीचे माजी संचालक निंबाजी काळवाघे ,ग्रामसेवक सोसायटीचे माजी अध्यक्ष अशा मतदारसंघातील १०० पेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी शिवबंधन बांधून शिवसेना ऊ बा ठा पक्षात प्रवेश घेतला. यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वांचे कौतुक करून बुलढाणा जिल्ह्यात पक्ष वाढवण्याच्या सूचना केल्या.

# मोबाइल चोरीचा प्रयत्न फसला; चोरट्यास पकडले



**जनसंचलन/ खामगाव**

आठवडी बाजार परिसरातील इंगळे हार्डवेअर दुकानात एका तरुणाने मोबाइल चोरण्याचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (१३ जुलै) दुपारी घडली. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात नीलेश महेश म्हैसागर याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता ३०३ (२), ६२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अभय राजेंद्र इंगळे (३१, रा. सुटाळपुरा, खामगाव) हे हार्डवेअर व्यवसायिक असून, घटना घडली तेव्हा ते आपल्या दुकानात उपस्थित होते. त्यांनी अंदाजे २० हजार रुपये किंमतीचा मोबाइल काउंटरवर ठेवला होता. दुपारी सुमारे ३.३० वाजताच्या सुमारास नीलेश म्हैसागर तेथे दुकानात आला आणि मोबाइल चोरण्याचा प्रयत्न करू लागला; मात्र इंगळे यांनी त्याला रंगेहाथ पकडले. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी तत्काळ कारवाई करत गुन्हा नोंदवला असून, पोलिस हवालदार संतोष इटमल्लू तपास करत आहेत. प्राथमिक तपासात पोलिसांनी चोरीचा मोबाइल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# उद्धव ठाकरे नाशिकच्या मैदानात; जुलैअखेर दोन दिवसीय दौरा, निवडणुकांचे रणशिंग फुंकणार

**नाशिक:** नाशकात शिवसेना ठाकरे गटाला गळती लागल्यानंतर नाशिकचा गड सावरण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे नाशिकच्या मैदानात उतरणार आहेत. जुलैच्या शेवटच्या आठवड्यात नाशिकच्या दोन दिवसीय दौऱ्यावर येत आहेत. आगामी महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी राजकीय व्यूहरचना या दौऱ्यात निश्चित केली जाणार आहे. त्यासाठीची तयारी पक्षाकडून सुरू झाली असून, आज, मंगळवारी (दि.१५) पक्ष कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे.



शिवसेनेतील बंडानंतर नाशिकचा ठाकरे गटाचा गड अभेद्य होता. परंतु, कालांतराने नाशिकमधून ठाकरे गटात आऊटगोईंग सुरू झाले आहे. उपनेते सुधाकर बडगुजर, महानगरप्रमुख विलास शिंदेंसह २६ माजी नगरसेवकांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत शिंदेसेनेत प्रवेश केला. पाठोपाठ उपनेते सुनील बागूल, मामा ठाकरे यांनीही भाजपची वाट धरल्याने ठाकरे गटाची पुरती वाताहत झाली आहे. आगामी महापालिका, जिल्हा परिषद निवडणुकांपूर्वी ङ्गउबाठाफ्ला जमीनदोस्त करण्याची गर्जना भाजपचे नेते तथा राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केली होती. नाशिकमधील उरल्यासुरल्या ङ्गउबाठाफ्ला सुरूंग लावून महाजन यांनी महिनाभरातच आपला शब्द खरा केला.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाला या संकटातून बाहेर काढण्यासाठी ठाकरे यांनी आपले शिलेदार पाठवत ङ्गडॅमेज कंट्रोलफ्चा प्रयत्न केला. परंतु, त्यात यश मिळू शकले नाही. त्यामुळे आता खुद्द उद्धव ठाकरे मैदानात उतरले असून, जुलैअखेर अथवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात ते नाशिक दौऱ्यावर येत असून, पक्षाचा गड सावरण्यासाठी प्रयत्न करणार आहेत.शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या २७ जुलै रोजी होऊ घातलेल्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात भगवा सप्ताह साजरा केला जाणार आहे. ठाकरेंच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाची व दौऱ्याची रुपरेषा ठरविण्यासाठी आज, मंगळवारी दुपारी ४ वाजता शालिमार येथील पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आल्याची माहिती जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशी, महानगरप्रमुख प्रथमेश गिते यांनी दिली.

## जबरदस्ती डॉक्टर बनला पुष्कर जोग! म्हणाला, त्यांनी माझ्यासमोर दुसरा कोणता पर्यायच ठेवला नाही...

**मुंबई-** अभिनेता पुष्कर जोग हे मराठी सिने इंडस्ट्रीतले असे नाव आहे जे बरेचदा वेगवेगळ्या कारणांसाठी चर्चेत असते. पुष्करने आजवर अनेक मालिका आणि चित्रपटांमध्ये काम केले आहे. यावेळी तो निर्मिती आणि दिग्दर्शन क्षेत्रात सुद्धा आपले नशीब आजमावत आहे. गेल्या काही वर्षात अनेक सुपरहिट उत्कृष्ट सिनेमांची त्याने निर्मिती केली. आज पुष्कर जोग त्याचा ३९ वा वाढदिवस साजरा करत आहे. त्यानिमित्त आपण त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल काही गोष्टी जाणून घ्या.पुष्कर जोग हा उत्तम अभिनेता, डान्सर, दिग्दर्शक, निर्माता आहे हे आपण सगळेच जाणतो. पण तो पेशाने डॉक्टर आहे हे फार कमी लोकांना ठाऊक असेल. पुष्कर हा एक डेंटिस्ट आहे. मुक्काम पोस्ट मनोरंजन या चॅनलला दिलेल्या मुलाखतीत त्याने डॉक्टर बनण्यामागचा किस्सा शेअर केला होता.तो म्हणाला की, मी जेव्हा बारावीत होतो तेव्हा मी पुढे भविष्यात मला काय करायचं आहे यासाठी प्लॅनिंग करत होतो. मला तर भविष्यात न्यूयॉर्क ला जाऊन ॲक्टींग आणि फिल्म मेकिंग शिकायचं होतं. पण माझ्या वडिलांना ते मान्य नव्हतं. ते म्हणाले की शिक्षण खूप महत्त्वाचं आहे. त्यामुळे हा फॉर्म मी तुझ्यासाठी घेऊन आलो आहे. तू साइन कर आणि उद्यापासून कॉलेजला जा. माझ्यासमोर काही ऑप्शन्स ठेवला नाही त्यांनी.भारती विद्यापीठ पुणे इथे त्यांनी मला



मेडिकलला टाकलं. मी एक डॉक्टर आहे. डॉक्टर पुष्कर जोग . पण मी कधी डॉक्टर लावत नाही. मी एक डेंटिस्ट आहे. मी पाच वर्ष डेंटिस्टी शिकलो. त्यात पास झालो. मी सर्व डॉक्टरांचा मान ठेवून खरोखर सांगतो की मला डॉक्टर कधी बनायचंच नव्हतं, आवड नव्हती पण आई-वडिलांमुळे बनलो. पण एवढं नक्की की त्याच्यानंतर आई वडिलांनी खूप सपोर्ट केला. डॉक्टर बनल्यानंतर तुला जे करायचे ते कर अशी त्यांनी मला मुभा दिली.पुष्कर जोग याच्या कामाबद्दल बोलायचे झाल्यास जबरदस्त या सिनेमातून त्याने पदार्पण केले होते. या सिनेमा त्याच्यासोबत भरत जाधव संजय नार्वेकर यांसारख्या कलाकारांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या. हा सिनेमा खूप गाजला. त्यानंतर त्यांनी बरेच सिनेमे केले पण त्यात फारसे यश आले नाही त्यामुळे त्यांनी निर्मिती आणि दिग्दर्शन क्षेत्रात हात आजमावला. त्यांनी बाप माणूस, विक्टोरिया एक रहस्य, अदृश्य, मुसाफिरा, वेल डन बेबी यांसारख्या अनेक सिनेमांचे दिग्दर्शन आणि निर्मिती केली आहे.

## दुर्दैवाने मराठीला जे स्थान मिळायला हवं ते मिळत नाहीये, हिंदीपेक्षा जास्त..., असं का म्हणाला नवाजुद्दीन सिद्दीकी?

**मुंबई-** सध्या राज्यांमध्ये मराठी आणि हिंदी भाषांवरून वाद सुरू असताना सिने इंडस्ट्रीमध्ये मात्र हा विषय गेली अनेक वर्ष सुरू आहे. बऱ्याच मराठी लेखक, निर्माते, दिग्दर्शक आणि कलाकारांची तक्रार असते की मराठीमध्ये उत्तम आशय देऊन सुद्धा मराठी प्रेक्षक मराठी सिनेमांकडे पाठ फिरवतात. किंवा बरेचदा थिएटर मालकांची मनमानी सिनेमांना बळी पडते. यावर अनेकांनी खंत व्यक्त केली असून हिंदी कलाकार सुद्धा याबाबत बोलत असतात. असे अनेक हिंदी कलाकार आहेत जे मराठी भाषेचे भरभरून कौतुक करतात.नुकताच मराठी फिल्म तर सोहळा पार पडला. त्यामध्ये राजकुमार राव, नवाजुदीन सिद्दिकी, जयदीप अहलावत , तब्बू यांसारखे अनेक गाजलेली हिंदी चेहरे उपस्थित होते. त्यावेळी नवाजुदीन आणि जयदीप अहलावत यांनी मराठी सिनेमांचं भरपूर कौतुक केलं.नवाजुदीन म्हणाला की, मराठीत कायम चांगले सिनेमे बनत आले आहेत. मी तर म्हणेन बॉलीवूड पेक्षा जास्त चांगले सिनेमे मराठीतच असतात. फॅन्ड्री, पोर्ट यांसारख्या बरेच आयकॉनिक सिनेमे आहेत. मराठी मधून नेहमी काही ना काही चांगलंच येत असतं. यामागचं कारणही काय तर सगळे थिएटर करून येतात. त्यांना आधी नाटकात काम करण्याचा सराव असतो. मराठीत असे अनेक कलाकार



आहेत जे खूप टॅलेंटेड आहेत मात्र त्यांना तितकं यश मिळत नाही. दुर्दैव म्हणजे त्यांना जे स्थान मिळायला हवं ते अजून मिळालेलं नाही. कलाकारांना घेऊन मग त्यांना स्टार बनवायचं, मोठ्या बजेटचे सिनेमे करायचे हेच चलन जर आपल्याकडे आलं तर नक्कीच इंडस्ट्रीत मोठा बदल घडेल.फिल्मफेअर मराठीच्या सोहळ्यात तब्बूसुद्धा आलेली. तिने सुद्धा रंगमंचावर मराठी बोलण्याचा प्रयत्न केला. तसेच महेश मांजरेकरांचे भरभरुन कौतुक केले. मराठी हिंदी भाषा वाद हा महाराष्ट्रात गेली अनेक वर्ष सुरू असला तरी यंदा सरकारने शालेय शिक्षणाचे नवीन धोरण जाहिर केल्यावर तो आणखी चिघळला. महाराष्ट्रात मराठी भाषेला मानाचे स्थान देण्यासाठी अनेकजण एकत्र आले. ठाकरे बंधूंनी मोर्चाची घोषणा केली. पण त्याआधीच सरकारने वाढता निषेध पाहता हा निर्णय मागे घेतला.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# थंड वातावरणात राजकारण तापणार? मनसेच्या ३ दिवसीय राज्यस्तरीय शिबिराला इगतपुरीत सुरुवात



**नाशिक:** त्रिभाषा सूत्राच्या सक्तीच्या गरमागरमीनंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंमधील जवळीकीने राज्याचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर आता थंड हवामान, रिमझिम पाऊस आणि गुप्त तटबंदीत राज ठाकरेंच्या उपस्थितीत राज्यातील निवडक १२० शिलेदारांच्या तीनदिवशीय मंथन शिबिराला सोमवारपासून (दि. १४) सुरुवात झाली. राज्यभरातून आलेल्या पदाधिकाऱ्यांशी राज ठाकरे बंद दाराआड चर्चा करून युतीबाबतचे त्यांचे मत जाणून घेऊन पुढचे पाऊल टाकणार आहेत. त्यामुळे इगतपुरीतल्या थंड वातावरणात सुरू असलेल्या शिबिरातील निर्णयानंतर राज्यातील आगामी राजकारण तापण्याची शक्यता आहे. मराठी भाषेच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू विजयी मेळाव्यात एकत्र आल्यानंतर दोन्ही पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून युती करण्याबाबतचा दबाव वाढला आहे. त्यानंतर राज यांनी युतीबाबत कोणीही भाष्य करू नये असा सज्जड दम आपल्या पदाधिकाऱ्यांना भरला होता. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार की नाही, याबाबत सस्पेन्स वाढला आहे. युती व्हावी अशी पदाधिकाऱ्यांची इच्छा असली, तरी ठाकरेंच्या मनात काय, याबाबतचाही सस्पेन्स आहे. युती झालीच, तर आपल्याला कोणत्या जागा मिळतील, याबाबतही संभ्रम आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी युतीबाबत निर्णय घेतला जाणार असला तरी, त्यासाठी ठाकरेंनी आता पदाधिकाऱ्यांचे समोरासमोर मत जाणून घेण्याचा निर्णय घेतला आहे.मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर येथील १२० पदाधिकाऱ्यांना इगतपुरीच्या थंड वातावरणात पाचारण केले आहे. या शिबिरासाठी तटबंदी उभी करण्यात आली असून, आत कोणालाही प्रवेश देण्यात आलेला नाही. केवळ १२० पदाधिकारीच हॉटेलमध्ये ठेवण्यात आले असून, त्यांच्या वाहनचालकासह, सुरक्षारक्षकांनाही या शिबिरापासून लांब ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या शिबिरात झालेला निर्णय राज्याच्या आगामी राजकारणाची दिशा बदलणारा ठरणार असल्याने या शिबिराकडे मराठी जनतेसह महायुतीचेही लक्ष लागून आहेनाशिक महापालिकेत मनसेची सत्ता असताना जे रस्ते झाले, त्याचे लोक आजही नाव घेतात. सध्याच्या रस्त्याची परिस्थिती अत्यंत खराब आहे, असे तुम्हीच सांगता. मागील कुंभमेळ्यातील रस्त्यांची कामे दर्जेदार होती. त्यावेळी रस्ते खराब झाले तर त्याच खड्ड्यात घालेल, अशी तंबी दिल्यामुळे चांगली कामे होऊ शकली. नाशिकचा खत प्रकल्प आजही देशांमधील उत्तम घनकचरा प्रकल्प असल्याचा दावा ठाकरेंनी केला. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संघटनात्मक बांधणी व नियोजनासाठी ठाकरे यांनी २१ जुलैनंतर नाशिक दौऱ्यावर येणार असल्याचे स्पष्ट केले. या शिबिरानंतर संघटना मजूबत करण्यासाठी नाशिकची निवड केली असून, त्यानंतर ठाकरे राज्यभर दौरा करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली..

# मुंबईसह उपनगरात मुसळधार, घाटमाथ्यावर यलो अलर्ट; कसा असेल पावसाचा अंदाज?

**पुणे** : मागील जवळपास आठवडाभर राज्यातील अनेक भागात पावसाने उघडीप घेतली होती. गेले काही दिवस पावसाचा जोर बऱ्यापैकी ओसरला होता. त्यानंतर आता आठवड्याच्या सुरुवातील काल सोमवारी पावसाने मुंबईसह उपनगरात आणि राज्यातील विविध भागात जोरदार हजेरी लावली. हवामान खात्याकडून २४ तासांसाठी मुंबई शहर आणि उपनगरांत साधारणपणे ढगाळ आकाश आणि अधूनमधून मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवला होता. शिवाय अधूनमधून जोरदार वारे वाहण्याची शक्यताही हवामान खात्याने वर्तवली होती. या अंदाजानुसारच सोमवारी दिवसभर जोरदार ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होता. कमी दाबाचे क्षेत्र वायव्य मध्यप्रदेश आणि पूर्व भागात आहे. पुढील २ दिवसांत राजस्थानमधून हळूहळू पश्चिम दिशेने सरकण्याची शक्यता आहे. दुसरे कमी दाबाचे क्षेत्र आता दक्षिण-पश्चिम बांगलादेश आणि पूर्व-पश्चिम भूमध्य समुद्रावर आहे. पुढील २४ तासांत वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पुणे, उत्तर मध्य महाराष्ट्रातील काही भागांसह उत्तर कोकणात मध्यम प्रमाणात वारे वाहू शकतात.दरम्यान, तरी नाशिक शहरात सोमवारी दुपारी पावसाच्या मुसळधार सरी कोसळल्या. अवघ्या दोन तासांमध्ये ३१.२ मिलिमीटर पाऊस नोंदविला गेला. अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडवली.ग्रामीण भागातही काही ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लावली. नाशिक शहरात गेल्या आठवड्यात पावसाने दमदार हजेरी लावली होती. परंतु, त्यानंतर हळूहळू पावसाचा जोर कमी होत गेला. सोमवारी (दि. १४) हवामान विभागाने नाशिकसह घाटमाथ्यावर पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. दुपारी दीडनंतर शहरावर ढग दाटून आले. काही वेळातच जोरदार पावसाला सुरुवात झाली. तब्बल दोन तास पावसाच्या मध्यम ते मुसळधार स्वरूपाच्या सरी कोसळत होत्या. या दोन तासांमध्ये शहरात ३१.२ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. अवघ्या काही मिनिटांतच शहरातील रस्त्यांवर पाणी-पाणी होऊन अनेक ठिकाणी



तळी साचली. त्यामधून वाट शोधताना वाहनचालकांची धांदल उडाली.दरम्यान, सकाळी साडे आठपर्यंतच्या २४ तासांमध्ये २.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. जिल्ह्यात सरासरी ३.२ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला, पेठमध्ये १६.५, तर त्र्यंबकेश्वरमध्ये १६.४ मिलिमीटर पाऊस झाल्याचे जिल्हा प्रशासनाने सांगितले.

# लिपस्टिक आणि जेल लावून अल्पवयीन मुलांवर अनैसर्गिक अत्याचार, कल्याण रेल्वे स्थानकातून नराधमाला अटक



**कल्याण :** दोन अल्पवयीन मुलांवर अनैसगिक अत्याचार करणाऱ्या विकृताला कल्याण रेल्वे पोलिसांनी बेड्या ठोकल्याची घटना समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे हा नराधम विकृत पीडित अल्पवयीन मुलांना लिपस्टिक आणि जेल लावून अनैसगिक अत्याचार करीत असल्याचे पोलीस तपासात उघडकीस आले आहे अरुण उत्तप्पा ( २८ रा वडाळा मुबंई ) असे या विकृत अटक आरोपीचे नाव आहे . रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित दोन्ही अल्पवयीन मुले वडाळा येथे राहणारे आहेत तर, नराधम अरुण हाही याच परिसरात राहत असून ते एकमेकांच्या ओळखीचे आहेत त्यातच रविवारी संध्याकाळच्या सुमारास कल्याण रेल्वे स्थानकात फलाटावर फिरत असलेल्या तीन संशयितांना रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याकडे चौकशी केली. दोन्ही पीडित लहान मुले ११ वर्षाची असून पोलीस चौकशीत नराधम अरुण याने पीडित दोन अल्पवयीन मुलांना फिरण्याच्या बहाण्याने कल्याण रेल्वे स्थानकात परिसरात आणले होते. मात्र कल्याण रेल्वे स्टेशनवर या तिघांना पाहून गस्तीवर असणाऱ्या रेल्वे पोलिसांच्या पथकाला संशय आला. त्यांनी नराधम अरुणसह या दोन्ही अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतलं त्यांची चौकशी केली असता हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. दरम्यान, या मुलांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी मुलांना लिपस्टिक लावून तसेच जेलचा वापर करून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. कल्याण स्थानकातून पुढे जाण्याच्या तयारीत असलेल्या या तिघांवर पोलिसांना संशय आल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. चौकशी केल्यानंतर या चिमुकल्यांची नराधमाच्या तावडीतून सुटका झाली आहे.या संदर्भात कल्याण रेल्वे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरी कांदे यांच्याशी संपर्क साधला असता आरोपी हा अनेक महिन्यांपासून पीडित अल्पवीयन मुलांवर लैंगिक अत्याचार करत होता. पीडित मुलं आणि आरोपी हे तिघेही मुंबईतील वडाळा परिसरात राहत असल्याने कल्याण रेल्वे पोलिसांनी हा गुन्हा वडाळा पोलिसांकडे वर्ग केला आहे. तसेच नराधमाकडून लिपस्टिक आणि जेल जप्त केल्याची माहितीही त्यांनी दिली आहे.

# टार्गेट कमी होतं, आम्ही जिंकलो असतो पण एका गोष्टीने केला घात, शुभमन गिलने सांगितलं पराभवाचं एकमेव कारण...

**लंडन :** भारताला विजयासाठी मोठं टार्गेट नव्हतं, आम्ही हा सामना जिंकू शकलो असतो, पण आमच्याकडून एक चूक घडली आणि सामना फिरला, असे भारताचा कर्णधार शुभमन गिलने पराभवानंतर स्पष्ट केले आहे.भारताला विजयासाठी इंग्लंडने १९३ धावांचे आव्हान दिले होते. हे आव्हान माफक दिसत होते. भारत हा सामना सहज जिंकेल, असे वाटत होते. पण इंग्लंडने सतत भारतावर कायम दडपण बनवले. भारताला या सामन्यात पराभव पत्करावा लागला. भारतापुढे मोठे आव्हान नव्हते, पण तरीही भारताला या सामन्यात पराभव का पत्करावा लागला, याचे कारण आता शुभमन गिलने सामना संपल्यावर सांगितले आहे.शुभमन गिल म्हणाला की, ङ्कङ्क माझ्यासाठी हा अभिमानाचा क्षण आहे, कारण कसोटी क्रिकेट चांगलं रंगलं, उत्साहवर्धक झालं. पाचव्या दिवशी सकाळी जेव्हा आम्ही मैदानात आलो, तेव्हा आमचा आत्मविश्वास चांगला होता. कारण आमच्या हातात जास्त विकेट्स होत्या. या सामन्यात आम्हाला विजयासाठी देण्यात आलेलं टार्गेट काही मोठं नव्हतं. आम्ही हा सामना जिंकू शकलो असतो. पण यावेळी एक चूक आमच्याकडून घडली. आमच्या हातात विकेट्स होत्या. जी एक चूक आम्ही केली आणि ती म्हणजे आम्ही भागीदाऱ्या रचण्यावर जास्त भर दिला नाही. जर आमच्याकडून चांगल्या भागीदाऱ्या झाल्या असत्या तर नक्कीच हा सामना आम्ही जिंकतो असतो. पण दुसरीकडे इंग्लंडने चांगला खेळ केला आणि त्यामुळेच त्यांना विजय मिळवता आला. या सामन्यात मोक्याच्या क्षणी त्यांनी चांगली कामगिरी केली, जी आम्हाला जमली नाही. आम्ही चांगली लढत दिली, याचा मला आनंद आहे. पण मोक्याच्या क्षणी काही गोष्टींचा अवलंब आम्हाला करता आला नाही. ङ्कङ्कभरतीय संघाला जिंकण्यासाठी २०० पेक्षाही कमी धावा हव्या होत्या. त्यामुळे भारताला या सामन्यात जिंकण्याची सर्वात जास्त संधी होती. पण तरीही भारताच्या फलंदाजांनी या संधीचे सोने केले नाही आणि त्यामुळे भारताला मोठा धक्का बसल्याचे समोर आले. आता पुढच्या कसोटी भारताचे फलंदाज कशी कामगिरी करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

# सुखाचा संसार, पदरात दोन लेकरं; उच्चशिक्षित दाम्पत्याचा एकाच वेळी जीवन संपवण्याचा प्रयत्न...

**सिडको :** अंबड परिसरातील फडोळ मळा भागातील उच्चशिक्षित दाम्पत्याने एकाच वेळी जीवन संपविण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना सोमवारी सकाळी उघडकीस आली. त्यामुळे सिडको परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती. फडोळ मळा येथील अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या य दाम्पत्यास अत्यवस्थ स्थितीत रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, दोघांचीही प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रथम विवाहितेने अज्ञात कारणातून घरातील बेडरूममध्ये विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही बाब त्यांच्या पतीच्या लक्षात येताच यांनीही भावनेच्या चाकूने स्वतःच्या हाताची नस कापून घेतली. ही घटना घरात असलेल्या त्यांच्या वृद्ध मातेच्या लक्षात येताच त्यांनी आरडाओरडा केल्याने शेजारी धावले आणि रस्त्यावरील नागरिकांनीही माणुसकी दाखवत अत्यवस्थ स्थितीतील दाम्पत्यास वेगवेगळ्या रुग्णालयांत दाखल केले. आयटी कंपनीत नोकरी करणाऱ्या या उच्चशिक्षित दाम्पत्यास दोन लहान मुले आणि वृद्ध आई-वडील आहेत. या हसतमुख दाम्पत्याने उचललेल्या टोकाच्या पावलामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती. सर्वांशी मिळूनमिसळून वागणाऱ्या उच्चशिक्षित दाम्पत्याने आत्महत्येच्या प्रयत्नाचे टोकाचे पाऊल उचलल्याने ही घटना केवळ त्यांच्या कुटुंबालाच नव्हे, तर शेजारी, परिचित, संपूर्ण परिसरासाठीच भावनिक हादरा देणारी ठरली. अंबड पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला आहे. या दाम्पत्याने टोकाचे पाऊल का उचलले, याचे कारण स्पष्ट झालेले नाही. मात्र, एका कुटुंबाचे हे तुटलेपण आणि वृद्ध आई-वडील व दोन चिमुकल्यांसमोर उभे ठाकलेले अनुत्तरित आयुष्य अशी वस्तुस्थिती अनेकांच्या मनाला चटका लावणारी ठरली.

# पर्यटकांच्या जीवाशी खेळ! लोणावळ्यातल्या प्रसिद्ध उपहारगृहात उंदरांनी चावलेल्या बटाट्यांचे वडापाव आढळल्याचा आरोप...

**रायगड :** लोणावळ्यात पर्यटकांची नेहमीच खूप गर्दी असते. याच लोणावळ्यातील प्रसिद्ध चौधरी वडापाव दुकानात धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. नुकत्याच केलेल्या तपासणीत, या दुकानाच्या किचनमध्ये अनेक गंभीर त्रुटी आढळल्या. सडलेले बटाटे, उंदराने कुरतडलेला भाजीपाला आणि अस्वच्छता आढळून आली. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. चौधरी वडापावच्या किचनमध्ये आरोग्याच्या नियमांचे उल्लंघन होत असल्याचे तपासणीत उघड झाले. किचनमध्ये खूप घाण होती. उंदरांनी धुमाकूळ घातला होता. तसेच, खराब अन्नसामग्री साठवलेली होती. धक्कादायक बाब म्हणजे, काही सडलेले आणि उंदरांनी खाल्लेले बटाटे वडापावमध्ये वापरले जात होते. दुकानात साफसफाईकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेले होते. कामगार हातमोजे किंवा टोपी न वापरता वडापाव बनवत होते. हात धुण्याची पुरेशी सोय नव्हती. स्वयंपाकघरात झुरळे आणि उंदीर फिरत होते.हे दुकान लोणावळ्यातील मध्यवर्ती भागात आहे. याच परिसरात अनेक हॉस्पिटल्स आहेत. त्यामुळे रुग्णांचे नातेवाईक, नर्स, डॉक्टर आणि पर्यटक येथे मोठ्या प्रमाणात खाण्यासाठी येतात. अशा ठिकाणी आरोग्याच्या नियमांचे उल्लंघन करणे धोक्याचे आहे. ङ्कङ्कसडलेले व दूषित अन्नपदार्थ खाल्ल्यामुळे विषबाधा, जुलाब, उलटी, पोटदुखी तसेच काही वेळा जीवघेणा संसर्ग होऊ



शकतो,ङ्कङ्क असे डॉक्टरांनी सांगितले. विशेषतः पर्यटक आणि लहान मुलांसाठी हे खूप धोकादायक आहे. लोणावण्यासारख्या पर्यटनस्थळी जीथे पर्यटकांची सतत ये-जा असते, अशा ठिकाणी हा किळसवाणा प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली. प्रसिद्ध अशा या दुकानात अशाप्रकारचा हलगर्जीपणा उघडकीस आल्याने अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले.प्रवासात पर्यटकांना सहज उपलब्ध होणारं खाद्य म्हणजे वडापाव. या पदार्थाने भूक भागली जाते शिवाय परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होत असल्याने नागरिकांचा कल वडापाव खाण्याकडे अधिक असतो. पण अशा खाद्यपदार्थांच्याबाबतीत हा किळसवाणा प्रकार समोर आल्याने पर्यटकांकडून संताप व्यक्त होत आहे. या घटनेनंतर अन्न व औषध प्रशासनाने चौधरी वडापाव सेंटरवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने नागरिकांना अशा गैरव्यवहार करणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेत्यांविरोधात तक्रार करण्याचे आवाहन केले

# डोक्यात हवा जाऊ न देता वागा; वादग्रस्त मंत्री, आमदारांना एकनाथ शिंदेंकडून कानपिचक्या

**मुंबई :** कमी कालावधीत अधिक यश मिळाल्याने बदनामीचे डाव आखले जात आहेत. त्यामुळे प्रत्येक गोष्टीची काळजी घ्या, पुढील काळ कसोटीचा आहे,फ अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी पक्षाच्या आमदारांना सावध केल्याचे समजते. ङ्गमी प्रमुखासारखे नव्हे, तर कार्यकर्त्यासारखे वागतो. त्यामुळे तुम्ही पण डोक्यात हवा जाऊ देऊ नका आणि सर्वसामान्यांची कामे करा,फ अशा शब्दांत त्यांनी आमदारांची कानउघाडणी केल्याचेही खात्रीलायकरित्या समजते. शिवसेनेच्या मंत्र्यांविषयी, तसेच आमदारांच्या विरोधात विरोधी



पक्षाकडून सातत्याने आरोप केले जात आहेत. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यातच आमदार संजय गायकवाड यांनी आमदार निवासातील उपाहारागृहातील कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याचे समोर आले. त्यामुळे पक्षाच्या विरोधात ऐन अधिवेशनकाळात विरोधी पक्षाला आयतेच कोलीत मिळाले. या सर्व पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वादग्रस्त मंत्री आणि आमदारांना एकनाथ शिंदे यांनी सोमवारी कानपिचक्या दिल्याचे समजते.तुमच्याकडे दाखवलेले बोट माझ्याकडे असते. तुमचे आमदार काय करतात, असा प्रश्न मला विचारला जात आहे. तुम्ही सगळी माझी माणसे आहात.

आपले कुटुंब एक आहे. तुमची बदनामी म्हणजे माझी बदनामी आहे. त्यामुळे तुम्ही चुकीच्या गोष्टींवर ऊर्जा वाया घालवू नका. कमी बोला आणि जास्त काम करा. बदनामीमुळे काही मंत्र्यांना घरी जावे लागले आहे, हे लक्षात ठेवा, असे सांगत त्यांनी वादग्रस्त मंत्री, तसेच आमदारांना अप्रत्यक्ष कारवाईचा इशाराही दिला आहे. आपल्या कुटुंबावर कारवाईचा बडगा उगारायला मला अजिबात आवडणार नाही. परंतु, मला कारवाई करायला भाग पडणार नाही, असेच काम तुमच्याकडून अपेक्षित आहे. मी रागावत नाही. मी प्रमुखासारखे वागत नाही. कार्यकर्त्यासारखे वागतो. त्यामुळे तुम्हीही तसेच वागा. आपल्या डोक्यात हवा जाऊ देऊ नका. कितीही पदे मिळाली तरी कार्यकर्ता आहे, असेच समजून कामे करा, असा सल्लाही शिंदे यांनी आमदारांना दिला.

---

# भीमाशंकरच्या जंगलात रिक्षावाल्याने लुटलं, ६९ वर्षीय वृद्धाचा आरोप...



**पुणे :** भीमाशंकरच्या घनदाट जंगलात रिक्षा चालकाने चाकूचा धाक दाखवून लुटल्याचा आरोप करणाऱ्या दिल्लीतील ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाने बनाव रचल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासातून हा प्रकार खोटा असल्याचे समोर आले असून, रिक्षा चालक निर्दोष ठरला आहे.या प्रकरणी बंडगार्डन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, चौकशीनंतर पोलिसांनी रिक्षा चालकाला नोटीस देऊन सोडले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीतील ६९ वर्षीय ज्येष्ठ नागरिक पुण्याला आले होते. शनिवारी सकाळी त्यांनी रेल्वे स्थानकाच्या बाहेरुन एका रिक्षा चालकाशी भीमाशंकर दर्शनासाठी करार केला. १५ हजार रुपयांमध्ये दर्शन करून परत येण्याचे ठरले. त्यापैकी १० हजार रुपये रोख आणि उर्वरित ऑनलाइन स्वरूपात त्यांनी दिले.ठरल्यानुसार रिक्षा चालक त्यांना घेऊन भीमाशंकरला गेला. संबंधित ज्येष्ठ नागरिक दुपारी मंदिरात गेल्यानंतर ते तीन-चार तास परत आलेच नाहीत. सतत संपर्क साधूनही त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्याने रिक्षा चालक पुण्याकडे निघून आला.चौकशीदरम्यान, रिक्षा चालकाने आपली बाजू स्पष्ट केली. तो घटनास्थळी थांबला होता; पण ज्येष्ठ नागरिक परत न आल्याने तो निघून गेला, असे त्याचे म्हणणे होते. पोलिसांनी दोन्ही बाजूंची पडताळणी केल्यानंतर हा बनाव असल्याचे निष्पन्न झाले.या खोट्या तक्रारीमुळे पोलिसांची अनाठायी धावपळ झाली. आता या प्रकाराची अधिक चौकशी सुरू असून, पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगर येथे गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या व लुटमारीच्या घटना वाढत आहे. शहरातील मिल कॉर्नर येथील श्री हनुमान मंदिर ट्रस्टच्या महादेव मंदिरात दानपेटी फोडल्याची घटना घडली. पैठण येथील वडवाळी बालाजी मंदिरातील दानपेटीही फोडण्यात आली.

# तुला चपात्याही नीट करता येत नाहीत....आईने पोटच्या मुलीला दिले चटके, १७ वर्षीय मुलीने...

**वाळूजमहानगर :** रांजणगाव शेणपुंजी येथील एका सतरा वर्षीय मुलीला स्वयंपाक येत नाही म्हणून चटके दिल्याने पीडित मुलीने आईवडिलांविरुद्ध शारीरिक छळ केल्याचा आरोप करून रविवारी पोलिसात तक्रार दिली आहे. पिंकी कंवर लक्ष्मणसिंग नाथावत (वय ३५), लक्ष्मणसिंग नाथावत (वय ४०, रा. रांजणगाव शेणपुंजी) असे मुलीचा छळ करणाऱ्या आईवडिलांचे नाव आहे. आई वडिलांनी डांबून ठेवल्याचा आरोपही पीडितेने केला आहे. रांजणगाव शेणपुंजी येथील एका १७ वर्षीय मुलीने स्वतःच्या जन्मदात्या आईवडिलांविरोधात छळ आणि शारीरिक अत्याचाराची तक्रार दिली. या वेळी पीडितेला आई स्वयंपाक येत नाही म्हणून घरात वारंवार अपमानास्पद वागणूक देत मारहाण केली जात होती. त्यामुळे पीडितेला शारीरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत होता. आईने मुलीला चपात्या करायला सांगितल्या. तिला चपात्या नीट आल्या नाही म्हणून तिच्या हातावर गरम चटके देण्यात आले.पीडितेला घराच्या गच्चीवर कोंडणे, बाथरूममध्ये कोंडणे,



शिवीगाळ करून मारहाण केली जात होती, असे आरोपही पीडितेने केले आहेत. या गोष्टींमुळे सतत अपमान व शारीरिक छळ होत असल्याने पोलिसात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस करीत आहेत.या घटनेने आता मोठी खळबळ उडालीये. चक्क १७ वर्षाच्या मुलीनेच आपल्या आई वडिलांविरोधात तक्रार दाखल केलीये. मागील काही वर्षांपासून तिला हा त्रास होत असल्याचे तिने आपल्या तक्रारीत म्हटले आहे. चपात्या व्यवस्थित आल्या नसल्याने चक्क तिच्या हाताला चटके देण्यात आली. यानंतर मुलीने थेट पोलीसात धाव घेतली. यापूर्वीही आपला शारीरिक आणि मानसिक छळ हा आई वडिलांकडून करण्यात आल्याचे मुलीने आपल्या तक्रारीत म्हटले आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा: उज्वल भविष्याची नांदी!

## विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी समाजाच्या वतीने उसळला जनसागर...

## पुढचा येणारा हा कार्यक्रम हिवरा आश्रम येथे होणार -मा. आमदार संजय रायमुलकर

**जनसंचलन/बुलडाणा**
**अजय राजगुरे**

विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समिती बुलढाणा जिल्ह्याच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. हा भव्य दिव्य कार्यक्रम १३ जुलै रोजी श्री क्षेत्र येलोजी महाराज संस्थान जांभोरा ता. चिखली या ठिकाणी घेण्यात आला आहे. या सोहळ्यात शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये १०वी १२ वी तसेच पदवी प्राप्त यासह शासकीय नोकरीवर रुजू झालेली विद्यार्थी तसेच खेळाडू सर्वाधिक गुण मिळवलेले, विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थ्यांनी आपले विशेष स्थान पटकावले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. सुतार समाज एकीकरण समिती बुलढाणा जिल्हाध्यक्ष अनंतराव राऊत यांनी विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि त्यांच्या पालकांच्या त्यागाचे कौतुक केले. ते म्हणाले, ड्ड्हे विद्यार्थी केवळ त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे, तर आपल्या समाजाचे आणि देशाचे भविष्य आहेत. त्यांचे यश इतरांनाही प्रेरणा देईल. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे, प्रशस्तीपत्र देण्यात आले आहे. यासह विशेष कमी गुण मिळवल्या विद्यार्थ्यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान आणि पालकांच्या डोळ्यातील अभिमान स्पष्ट दिसत होता.

कार्यक्रमाची प्रमुख पाहुणे वैज्ञानिक कृषी विद्यापीठ जालना श्रीकृष्ण सोनुने साहेब, माजी आमदार मेहकर विधानसभा संजयजी रायमुलकर, हिवरा आश्रम चे उपाध्यक्ष अशोक जी थोरहाते, यांनी आपल्या मार्गदर्शनात्मक भाषणात विद्यार्थ्यांना उच्च ध्येये ठेवण्याचे, कठोर परिश्रम करण्याचे आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे आवाहन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, ड्ड्शिक्षण हे केवळ ज्ञान मिळवण्याचे साधन नाही, तर ते व्यक्तिमत्त्व विकासाचे आणि उज्वल भविष्य घडवण्याचे प्रवेशद्वार आहे.ड्ड्

यासोबतच मेहकर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार संजयजी रायमुलकर यांनी सांगितले की पुढचा येणारा हा भव्यदिव्य कार्यक्रम हिवरा आश्रम येथे घेण्यात येणार आणि या कार्यक्रमाचा संपूर्ण नियोजन माझ्याकडे राहील तुम्ही सर्व पाहुण्यांसारखे या कार्यक्रमाला उपस्थित राहायचं असे त्यांनी यावेळी सांगितले आहे.

हा सोहळा विद्यार्थ्यांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरला आणि त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ प्रदान केले. यासोबतच समाजाची ताकद काय असते यावेळी दिसून आली हजारोच्या संख्येने समाज बांधव या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी उपस्थित होते. समाजाच्या



१२५ विद्यार्थ्यांचा सत्कार या ठिकाणी करण्यात आला आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विश्वकर्मा सुतार समाज एकत्रीकरण समिती बुलढाणा जिल्हा च्या संपूर्ण टीमने परिश्रम घेतले आहे त्यांचा सुद्धा या ठिकाणी कौतुक करण्यात आले आहे

## अधिपरिचारिका लिंग अधारित नियम रद्द करण्यासाठी अमोल रिंढे शासन दरबारी आवाज उठवणार !

**जनसंचलन/बुलडाणा**

डीएमईआर सरळ सेवा भरतीतील अधिपरिचारिका सेवा प्रवेश नियम २०२५ हा नर्सिंग व्यवसायात लिंग भेदभाव निर्माण करतो. नर्सिंग व्यवसायात स्त्रिया - पुरुष यांचे ८०:२० प्रमाण बंधनकारक केल्यामुळे पात्र पुरुष उमेदवारांची संख्यात्मक संधी कमी होते. तरी हा अन्यायकारक नियम रद्द करण्यात यावा, या मागणीचे निवेदन मेल नर्सेस बचाव समितीच्या वतीने १४ जुलै रोजी मनसे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे यांना देण्यात आले. याप्रकरणी मेल नर्सेस बचाव समितीला आश्वस्त करत अमोल रिंढे पाटील यांनी अधिपरिचारिका लिंग अधारित नियम रद्द करण्यासाठी शासन दरबारी आवाज उठवणार असल्याची ग्वाही दिली. निवेदनात नमूद आहे की, मेल नर्से स बचाव समिती, महाराष्ट्र राज्य च्या वतीने आम्ही आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, ११ जून २०२५ रोजी डीएमईआर द्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या अधिपरिचारिका सेवा प्रवेश नियम २०२५ मध्ये ८०:२० लिंग विभाजक नियम लागू करण्यात आला आहे. हा नियम पुरुष परिचारकांवर स्पष्ट अन्याय करतो व नर्सिंग व्यवसायात लिंग भेदभाव निर्माण करतो. नर्सिंग व्यवसायात स्त्रिया पुरुष यांचे ८०:२० प्रमाण बंधनकारक केल्यामुळे, पात्र पुरुष उमेदवारांची संख्यात्मक संधी कमी होते. हा नियम भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १४, १५ (१) आणि १६ (१) च्या विरोधात आहे जे समानता, भेदभावास मनाई व संधींची समानता याची हमी देतात. त्यामुळे हजारो पात्र पुरुष नर्सिंग उमेदवारांना सरकारी सेवेतून वंचित केले जात आहे. तरी ८०:२० लिंगविभाजक नियम तत्काळ रद्द करण्यात यावा. नर्सिंग भरती ही केवळ शैक्षणिक गुणवत्ता व पात्रता आधारित लिंगनिरपेक्ष व संविधानबदरीने पार पाडावी. पुरुष नर्सिंग अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र धोरण तयार करून त्यांना सन्माननीय प्रतिनिधित्वाची हमी देण्यात यावी. संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शक, न्याय्य आणि सर्वसमावेशक पद्धतीने राबवावी, असेही निवेदनात नमूद आहे. आगामी एक महिन्याच्या आत शासनाने हा निर्णय रद्द केला नाहीतर मनसे स्टाईलने आंदोलन करणात येईल असा इशारा देत अमोल रिंढे पाटील यांनी मेल नर्सेस बचाव समितीच्या मांगण्यांकडे सरकारचे लक्ष्य वेधलेआहे.

## मिलन सायकल व टायर दुकानाला भिषण आग,आगीत लाखोंचे नुकसान....



**जनसंचलन/धाड**

धाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात असलेल्या मिलन सायकल व टायर दुकानाला १४ जुलै रोजी रात्री ७.३० वा दरम्यान अचानक आग लागली. या घटनेत सायकल आणि टायर दुकानातील लाखो रुपयांचे साहित्य जळुन खाक झाले आहे. जवळपास ४ ते ५ लाखांचे नुकसान झाल्याचे अंदाज आहे.. या संदर्भात प्राप्त माहितीनुसार १४ जुलै रोजी सायंकाळी मिलन सायकल व टायर दुकान मालक शेख नाजिम शेख रज्जाक हे दुकान बंद करुन घरी गेले असता रात्री ७.३० वा दरम्यान बंद दुकानातुन धुर निघताना नागरीकांना आढळून आला, काही वेळेतच संपूर्ण दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडले आणि प्रचंड प्रमाणात आगीचे लोट बाहेर पडले. यावेळी नागरीकांनी घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने गावातील दोन टँकरधारक युवकांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. साधारण दोन तास आगीचे रौद्र रूप सुरु होते.नागरीकांनी आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या टायर दुकानाच्या शेजारील ईतर दुकानांमधील साहित्य बाहेर काढून आग इतरत्र पसरण्यापासुन वाचवण्यात यश मिळवले. आग लागण्याचे कारण समजु शकले नाही.या घटनेत आगीच्या भक्ष्यस्थानी पडलेल्या दुकानातील सायकली, मोटारसायकल टायर,तिन चाकीचे टायर,व इतर साहित्य जळुन खाक झाले आहे. उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश मिळाल नव्हते.

# सोलर घोटाळा प्रकरणात मोठा झटका सीओकडून सोलर कंपनीला १ कोटी १६ लाखांचा टॅक्स नोटीस

**जनसंचलन/मोताळा**

मोताळा नगर पंचायत हद्दीत उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पात फसवणूक करून कोट्यवधींचा टॅक्स बुडवणाऱ्या सोलर कंपन्यांवर आता कायद्याचा विळखा पडू लागला आहे. बोगस एनओसी आणि सीओच्या खोट्या सहीच्या आधारे सुरू झालेल्या या सोलर घोटाळ्याप्रकरणी बोराखेडी पोलीस ठाण्यात नगराध्यक्ष माधुरी देशमुख, मान्यता प्राप्त नगरसेवक अमोल देशमुख यांच्यासह पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे तब्बल १६ दिवस उलटूनही एकही आरोपी अटकलेला नाही. त्यामुळे बोराखेडी पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर आता मोताळा नगर पंचायतचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी २ म आणि म या सोलर कंपन्यांना ३ वर्षांचा थकित मालमत्ता कर १,१६,८०,४०० भरण्याची नोटीस बजावली आहे. जर हे रक्कम तातडीने न भरली, तर संबंधित सोलर प्रकल्प जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देखील सीओ पांडे यांनी दिला आहे.




याशिवाय सोलर प्रकल्पासाठी वापरलेल्या जमिनीचे एनए (-) रूपांतरण करणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले असून, झाडे तोडून पर्यावरणाला नुकसान केल्याबद्दलच्या कराची भरपाईही सोलर कंपन्यांकडून वसूल केली जाईल

# अंढेरा पोलीसांचे अवैध दारू विक्रीवर दुर्लक्ष! एलसीबीनें कारवाई करून ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल केला जप्त

**जनसंचलन/बुलढाणा**



ग्रामीण भागात अवैध देशी दारू धडाक्यात विकल्या जात असून एलसीबीच्या पथकाने अंढेरा पोलीस ठाणे अंतर्गत ग्राम दिग्रस व सरंबा फाटा येथे २ आरोपींवर १४ जुलैला कारवाई करत ८ हजार ९६० रुपये किमतीच्या दारूसह एक मोटार सायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामुळे अंढेरा पोलीसांचे अवैध दारू विक्रीवर दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात अवैध देशी दारू विक्री धडाक्यात सुरू आहे.मूळ किमतीपेक्षा दुप्पट भावात ही दारू विकून अवैध दारू विक्रेते मालामाल होत आहेत. दारूची व्यसनाधीनता वाढली असून गोरगरीबांच्या संसाराची राख रांगोळी होत आहे.यातूनच गुन्हेगारीला वाट मोकळी होत असून,प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होतोय. मात्र अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत असे अवैध धंदे सुरू असून, या धंद्यांना अंढेरा पोलीसांचा आर्शिवाद असल्याचे दिसून येत आहे.मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी अवैध धंद्यांवर आसूड ओढत कारवाईचा धडाका लावला आहे.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखालील पथक कार्यवाहीसाठी सक्रिय झाले आहे. अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम दिग्रस व सरंबा फाटा येथे २ आरोपींवर १४ जुलैला कारवाई करत ८ हजार ९६० रुपये किमतीच्या दारूसह एक मोटार सायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई करण्यात आली. या कारवाईत देशी दारू सखू संत्रा १८० एमएलच्या ६४ बॉटल तर ९० एमएलच्या १०० बॉटल अशी एकूण ८ हजार ९६० रुपयांच्या दारूसह एक मोटरसायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कार्यवाही एपीआय संजय मातोंडकर, एएसआय ओम प्रकाश सावळे, वनिता शिंगणे, मंगेश सनगाळे, दीपक वायाळ या पथकाने केली आहे.

# सौजन्याची वागणूक कसली? बसवाहकाचा उर्मटपणाच! मलकापूर डेपो मधील वाहकाची प्रवाश्यासोबत अरेरावी!

**वृत्तसंस्था/बुलढाणा**

आधीच राज्यातील एसटी महामंडळाची दुरावस्था झाली असून,भंगार बसेस,चालक वाहकांची प्रवाशांशी उर्मट वागणूक, अपुऱ्या बसेस फेऱ्या या व इतर बाबीमुळे एसटी नेहमी चर्चेत असते.बुलढाणा जिल्ह्यात सात आगार आहेत. या आगारात असंख्य चालक वाहक कार्यरत आहे. या स्पर्धेच्या युगात खाजगी बसेस प्रवासी सुरु झाल्याने एसटी मागे पडताना दिसत आहे. अशात एसटी महामंडळाच्या प्रवाश्याशी सौजन्याची वागणूक या स्लोगनला हरताळ फासण्याचे काम वाहकाकडून होताना दिसत आहे. तशी लेखी तक्रार बुलढाणा आगारात झाली आहे. बुलढाणा आगारात मलकापूर ते छत्रपती संभाजी नगर ही बस लागलेली होती ती बस पकडण्यासाठी काही प्रवासी बस स्थानकावर उभे होते. काही जण बस मध्ये जागा पकडण्यासाठी गेले होते. बसच्या चालकाने बस मागे घेतली तेव्हा एका प्रवश्याने वाहकाला विनंती केली की दोन महिला प्रवासी बसच्या मागे धावतायेत थोडे थांबा.. तर यावर बस वाहक चिडले व त्यांनी प्रवाश्याला उद्धटपणाची वागणूक देत गाडी खाली ढकलून दिले.प्रवश्याने विनंती केली दोन मिनिटे थांबा सर अश्या भाषेत बोलून सुद्धा वाहक बोलले तु खाली उतर वेळ नाही. मागे खुप साऱ्या बसेस आहेत. वास्तविक पाहता बसमध्ये १२ ते १५ प्रवाशीच होते अर्धी बस रिकामीच होती व



त्या प्रवाश्याला खाली ढकलून दिले. तु आमच्या साहेबाना जाऊन विचार व जे सांगायचे ते सांग.. असेही ते वाहक बोलले. हे सर्व प्रवासी ऐकत होते. शेवटी त्या दोन महिलांना त्यांचं बस मध्ये बसवून दिले. मात्र त्या प्रवश्याने बुलढाणा आगारातील तक्रार वहीत लेखी नोंद करून अश्या वाहकांवर कायदेशीर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. एसटी महामंडळाने सौजन्याच्या वागणूकीची अमंलबजावणी करावी अशी मागणी प्रवासी वर्गाने केली आहे

# बुलढाण्यातून होंडा शाईन चोरली अन् मोताळ्यात विकली!

**जनसंचलन/ बुलढाणा**

शहर पोलिसांनी एका दुचाकी चोराला अटक करून ६५ हजार रुपये किंमतीच्या २ दुचाक्या जप्तीची कारवाई केली आहे. अलीकडे दुचाकी चोरीचे प्रमाण दिवसागणिक वाढत आहे. बस स्थानक किंवा अन्य ठिकाणी उभी केलेली दुचाकी घेऊन चोरटे पसार होतात.१६ एप्रिल रोजी शशिकांत श्रीधरराव सपकाळ रा. उमाळा ता.जि. बुलढाणा हे आपली एमएच २८ बीझ ३९०५ क्रमांकाची होंडा सीबी शाइन बुलढाणा बसस्थानकावर उभी करून ते मानस हॉटेलमध्ये जेवण करायला गेले होते.परतवून पाहिले तर त्यांची दुचाकी चोरीला गेल्याचे पाहून त्यांनी याबाबत शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती.या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल केला होता.या प्रकरणी तपाससूत्र हलविण्यात आल्याने दुचाकी चोरटा पोलिसांच्या जाळ्यात अडकला. पवन भगवान बरडे वय २५ रा. उमरा पांग्रा ता. पातूर जि.अकोला असे या चोरट्याचे नाव आहे. त्याने चोरलेली दुचाकी मोताळा येथील शेख मुजमीन शेख रफिक,शेख यासीन शेख सलीम यांना विकल्याचे पोलिसांना सांगितले.दरम्यान तपास पथकाकडून मोताळा येथून दुचाकी ताब्यात घेण्यात आली.शिवाय एमएच २८ एआर ४८२८ या क्रमांकाची आणखी एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे.सदर कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रवि राठोड यांचे नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक रवी मोरे,हेडकॉन्स्टेबल संदीप कायंदे, संतोष वाघ सुनीता खंडारे, विशाल बनकर, मनोज सोनुने, विनोद बोरे या पथकाने केली आहे.

# आरोग्य योजनांची अंमलबजावणी गतिमान करा -खरात

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांच्या अध्यक्षतेखाली तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची बैठक झाली. महात्मा फुले जनआरोग्य योजना, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य, तसेच आरोग्य विभागाच्या इतर योजनांची प्रगतिपूर्वक अंमलबजावणी, अडथळे आणि कामगिरी यांचा सविस्तर आढावा या वेळी घेण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात यांनी घेतला सविस्तर आढावा सीईओ खरात यांनी ग्रामीण व अतिदुर्गम भागांतील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा देण्यावर भर देत नियोजित उपक्रम वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. आरोग्य संस्थांच्या इमारतींच्या बांधकामास वेग द्या आणि सेवा रेषेपर्यंत पोहोचवा, असे सांगत त्यांनी बालिकांच्या जन्मदर वाढविण्यासाठी बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियानाशी समन्वय साधण्याचेही आवाहन केले. जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त १८ जुलैपर्यंत सप्ताह राबविण्यात येत आहे. त्यासंदर्भानेही त्यांनी १० जुलै रोजी बैठक घेत सविस्तर सूचना देत राबवावयाच्या विशेष कार्यक्रमांची माहिती दिली

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८